# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-४९ दिनांक - १६/०२/२०२४

## अल्पवयीन मुलींना धाक दाखवून त्यांचेवर लैगिक अत्याचार करणा-या “सिरियल रेपिस्ट” यास पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ६५/२०२४ भादविस कलम ३७७, ३६३ सह पोस्को ४,६,८,१० प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी या दिनांक १३/०२/२०२४ रोजी सकाळी १२.१५ वाजता ते १२.३० वाजताचे सुमारास त्यांचे राहते घरी झोपलेले असताना त्यांची पिडीत मुलगी वय ७ वर्षे ही तिचा चष्मा विसरल्याने तो घेण्यासाठी घरी आली असता पिवळा टी शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला, वय अंदाजे २५-३० वर्षे वयाचा अनोळखी आरोपी इसम हा बिल्डींगमध्ये आला. त्याने फिर्यादीच्या मुलीच्या हाताला पकडुन ती विरोध करीत असताना जबरदस्तीने त्याने तिच्या हाताला पकडुन बिल्डींगच्या टेरसवरती नेवून जबरदस्तीने पीडीत मुलीशी अनैसर्गीक संभोग केल्याबाबत फिर्यादी यांनी आचोळे पोलीस ठाण्यात दि.१३/०२/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गंभीर गुन्हयाची बातमी प्राप्त होताच मा. वरीष्ठांच्या आदेश व सुचनांप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कार्यालयाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन गुन्हयाच्या घटनास्थळावरुन पळून जात असताना सी सी टी व्ही कॅमेरामध्ये चित्रीत झालेल्या आरोपीताच्या प्राप्त अस्पष्ट फोटोचे आधारे अनोळखी आरोपीताचा शोध चालू झाला. सदर आरोपीत हा घटनास्थळावरुन पळून गेल्यानंतर आजुबाजुचे परीसरातील सी सी टी व्ही कॅमे-याचे फुटेजचे आधारे व गोपणीय बातमीदारामार्फत शोध घेतला असता सदर आरोपीत हा नालासोपारा प. एस.टी. डेपो जवळील झोपडपटटीमध्ये व डोंबीवली ता. कल्याण येथे राहत असल्याची माहीती प्राप्त झाली. तात्काळ दोन्ही ठिकाणी पोलीस पथक पाठवुन आरोपीताचा त्या परीसरात शोध घेतला. तपासामध्ये आरोपीताचा मो.नं. प्राप्त करून तांत्रिक विश्लेषनाव्दारे प्रवास करीत असलेल्या अजमेर एक्सप्रेस या ट्रेनचा अचुक अंदाज घेवून तपास पथक तात्काळ गुजरात बाजूकडे रवाना केले. सदर आरोपीत हा सुरत शहरात आल्याने सुरत सिटी क्राईम ब्रँच यांचे मदतीने आरोपीतास सुरत येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

**ताब्यात घेतलेल्या आरोपीत पुरुष इसमाचे वर्णन :-**

वय २८ वर्ष रा. सध्या रा. नालासोपारा एस टी डेपोचे बाजूची झोपडपट्टी, अक्षयबारचे समोर, नालासोपारा पश्चिम, तात्पु रा.- दिंडोरी, नवागाव सुरत शहर, मुळ गाव-देसुरी,ता.देसूरी जि-पाली, राज्य-राजस्थान

नमुद आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन अशाप्रकारे सुमारे ४ ते ५ महीन्यापूर्वी ओसवाल नगरी बाबा संकुल नालासोपारा पूर्व येथे एक ७ ते ८ वर्षाच्या मुलीस खेचून बिल्डींगच्या आडोशाला नेवून तिच्यासोबत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याच तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानुसार तुळींज पोलीस ठाणे येथील गुन्हे अभिलेख तपासला असता सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ७००/२०२३ भादविस कलम ३५४ सह पोस्को १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

## अटक आरोपीतांकडुन उघडकीस आलेले गुन्हे.

| अं. नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | आचोळे | ६५/२०२४ भादविस कलम ३७७, ३६३ सह पोस्को ४,६,८,१० प्रमाणे |
| २ | तुळींज | ७००/२०२३ भादविस कलम ३५४ सह पोस्को १२ प्रमाणे |

**गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नमुदचा गुन्हा घडले पासुन अथक व अविरतपणे सलग परीश्रम करुन केवळ सी सी टी व्ही फुटेजमध्ये प्राप्त अस्पष्ट फोटोच्या आधारावर तसेच गोपनीय बातमीदारामार्फत आरोपीताचे नाव निष्पन्न करुन गुन्हा करुन रेल्वेने पळून जाणा-या आरोपीतास सुरत येथून ताब्यात घेवून गुन्हा घडल्यापासुन ४८ तासामध्ये गुन्हा उघडकीस आणला आहे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री मधुकर पाण्डेय, मा. अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री अविनाश अंबुरे, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर प्रकाश शिंदे, सहा.फौज./रमेश भोसले, सहा.फौज/ संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पोहवा/ ०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पो.कॉ./ १२०९७ अमोल कोरे, मसुब/केकान, चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, सहा.फौज- संतोष चव्हाण नेम- सायबर गुन्हे शाखा तसेच सुरत सिटी क्राईम ब्रँचचे पोउपनिरी/ प्रविण सिंह पडियार, सहाफौज/शैलेश दुबे, सहाफौज/ फरीद खान, पोहवा/मनोज पाटील, पोहवा/ रविभाई चव्हाण, पोहवा/सत्ता भाई, पोशि/ आशिष दिव्होरा, पोशि/ दिनेश रबाडी यांनी केली आहे.

